# आपत्ती व्यवस्थापन

डॉ. शितल चंद्रकांत पाटील
राज्यशास्त्र विभाग, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर , (बुर्ली)

घोषवारा-
पृथ्वीवरील पर्यावरण हे सातत्याने बदलत जाणारे आहे. आज मनुष्य निसर्गावर विजय मिळवत अनेक मोठमोठे बदल करू पाहत आहे. प्रसंगी डोगंर पोखरून, जंगले नष्ट करून, सिमेंटची शहरे वसवत आहे. परंतु यातून निसर्गामध्ये प्रचंड बदल होत आहेत.निसर्गाला हे मनुष्याचे ओरबाडणे मान्य नाही. म्हणूनच इर्शाळवाडी, माळीन यासारख्या डोंगराच्या कुशीत वसलेल्या छोट्याछोट्या वस्त्या डोंगरमाथ्याने आपल्या कुशीत घेतल्या. असे महाभयंकर प्रलय निसर्गाचे रौद्र रूप सातत्याने मनुष्यासमोर आवाहन उभे करत आहे. मनुष्य हा निसर्गापुढे किती खुजा आहे हेच आपल्याला निसर्ग सातत्याने सांगत आहे. प्रस्तुत निसर्गाची पाऊले ओळखूनच आज आपत्ती व्यवस्थापनाची गरज निर्माण झाली आहे. त्यासंदर्भात शासकीय पातळीवर भरीव संस्थात्मक संरचना उभी करून अंमलबजावणी केली पाहिजे.

प्रस्तावना §

पृथ्वीवरील पर्यावरण हे जैविक आणि अजैविक घटकांनी मिळून बनलेले आहे. या जैविक आणि अजैविक घटकांच्या आतंर क्रियेतून निसर्गात अनेक छोटे मोठे बदल घडून येतात. ही बदलाची प्रक्रिया काहीवेळा संथगतीने तर काहीवेळा शीघ्र गतीने होत असते. त्याचे मोठे परिणाम मानव आणि निसर्गाचे अपरिमित नुकसान होत असते.

आपत्तीमुळे समाजाची मोठ्याप्रमाणात जीवित, आर्थिक आणि सामाजिक हानी होते. त्याचबरोबर ज्या राष्ट्रामध्ये ही आपत्ती ओढवली आहे त्या राष्ट्रावर दूरगामी परिणाम होतात. यासंबधी इतिहासामध्ये आपल्याला अनेक पुरावे मिळतात. भूकंप, महापूर, वाढते अवर्षण भूमिपात इत्यादीसारख्या आपत्तीचे मूळस्वरूपम्हणजे भौगोलिक आविष्कारच असतो. प्रस्तुत आपत्ती पृथ्वीच्या पृष्ठभागावर कोठे ना कोठे होतच असतात. या आपत्ती मनुष्याला थांबवता तर येत नाहीत परंतु विज्ञान तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्याची पूर्वसूचना मिळू शकते यामुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीपासून दूर राहता येते.

- आपत्ती व्यवस्थापनाचे घटक §

आपत्ती निवारण व्यवस्थापनाचे काही प्रमुख घटक आहेत ते पुढीलप्रमाणे

१. जोखीम मूल्यमापन §

आपत्ती व्यवस्थापनातील सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे ज्या ठिकाणी वारंवार आपत्ती घडून येते असे प्रदेश ओळखणे. यासंदर्भात ऐतिहासिक पुरावे संकलित करणे. प्रस्तुत प्रदेशातील नैसर्गिक पर्यावरणाची माहिती गोळा करणे. त्या प्रदेशातील लोकसंख्या व सामाजिक घटकांची माहिती संकलित करणे या सर्व गोष्टीवरून आपणास प्रस्तुत ठिकाणी घडून येणाऱ्या नैसर्गिक आपतीची वारंवारिता, तीव्रता आणि परिणामांची कल्पना येते याकरिता माहितीचे संकलन सातत्याने करावे लागते.

२. उपयोजित संशोधन-

आपत्ती व्यवस्थापनामध्ये सातत्य टिकवण्यासाठी निरीक्षण करणारी उपकरणे आणि प्रणाली यांची गरज असते. या उपकरणाच्या सहायाने धोक्याची सूचना देणारी प्रणाली विकसित करता येते यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली जाते. यामध्ये सदूर संवेदना, उपग्रह दळणवळण, जागतिक स्थाननिश्चिती प्रणाली या प्रणाली महत्वाची

भूमिका पार पडतात. याकरिता शासनाच्या काही संस्था/ संघटना कार्यरत आहेत. त्यामध्ये भारतीय अंतराळ संशोधन सांधताना राष्ट्रीय इमारत संशोधन संघटना, हवामान विभाग इत्यादी संघटन शैक्षणिक संस्था आणि विद्यापिठाबरोबर काम करीत आहेत. या संस्थाच्या संशोधनामुळे या शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग समाजभीमुख होऊन त्याचा आपत्ती व्यवस्थापनामध्ये उपयोग केला जातो.

३. लोकजागृती आणि प्रशिक्षण §

आपत्ती व लोकजागृती आणि प्रशिक्षण करणे फार महत्वाचे आहे. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय कर्मचार्यांना आपत्ती व्यवस्थापना संबधीचे प्रशिक्षण देणे गरजेचेअसते. लोकजागृती आणि प्रशिक्षणामुळे आपत्तीच्या काळात तातडीने मदतकार्य सुरु करत येऊ शकते याचा परिणाम असा होतो कि आपत्तीमुळे होणारे नुकसान काही प्रमाणात कमी होण्यास मदत होते.

४. संस्थात्मक संरचना-

आपत्तीनंतरचे व्यवस्थापन करण्यापेक्षा आपत्तीपूर्व व्यवस्थापन करण्यास्तही राष्ट्रीय स्तरावर एका संस्थेची स्थापना करणे गरजेचे आहे. आपत्ती व्यवस्थापनाकरिता संस्थात्मक संरचना असणे गरजेचे आहे ज्याच्या माध्यमातून विभागातील विकासात्मक कामावर देखरेख ठेऊ शकेल व त्यासाठी सल्लाही देऊ शकेल. या संकल्पनेतूनच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्यात आली ज्यामध्ये विविध विषयातील तज्ञांच्या ज्ञानाचा फायदा आपत्ती व्यवस्थापनामध्ये होईल.

५. निधी आणि साधनसंपत्ती-

आपत्ती व्यवस्थापनामध्ये ज्याप्रमाणे प्रशिक्षणाला महत्वाचे स्थान आहे तसेच स्थान पैसा या घटकाला आहे. कारणआपत्ती व्यवस्थापनामध्ये पैसा महत्वाचा आहे ज्या प्रदेशामध्ये आपत्ती आलेली आहे त्या प्रदेशाचे पुनर्वसन त्यांना दिली जाणारी तातडीची मदत याकरिता पैशाची फार आवश्यकता असते पैशाची जर तात्काळ उपलब्धता झाली तर सदर प्रदेश पूर्वस्थितीमध्ये आणणे सोयीचे होईल.

• आपत्ती व्यवस्थापन कायदा §

भारत हा देश विविध जैव विविधतेने समृद्ध असा देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये विविध जैविक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वैविध्य आहे. याबरोबरचविविध विनाशकारी आपत्तींचा देश म्हणून देखील भारताला ओळखले जाते. भारतात आपत्ती येण्याचे प्रमाण फार मोठ्याप्रमाणात आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५८ वर्षांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा झाला.२५ डिसेंबर २००५ रोजी हा कायदा पारित झाला. या माध्यमातून भारताची एक सुनियोजित व सर्वसमावेशक वाटचाल सुरु आहे.

जगभरामध्ये आपत्तीचे सत्र सारखे सुरुच आहे. आपत्तीच्या माध्यमातून सातत्याने प्राणहानी आणि वित्तहानी होत आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने आपत्तीचे धोके कमी करण्यासाठी२० व्या शतकातील शेवटचे दशक हे -डिझास्टर रिस्क रिडक्शन॰ दशक म्हणून घोषित केले. जगभरामध्ये एक गोष्ट निश्चित मानली की, आपत्ती आल्यानंतर केल्या गेलेल्या कार्यवाहीपेक्षा धोखा कमी करण्यासाठी केलेली कार्यवाही महत्वाची असते. भारतात १९९३ साली ओडीशाच्या चाक्रीवादळानंतर केंद्र सरकारने एक समिती स्थापन करून धोक्याचा आणि त्यापासून उद्भावणाऱ्या आपत्तीचा सर्वकष अभ्यास केला तसेच आपत्तीदरम्यान मदतकार्यासाठी व्यवस्थापनातील सगळे विभाग, शास्त्रीय संशोधनातील संस्था, शिक्षण संस्था आणि सामान्य जनसमुदाय तसेच बचावकार्य करणाऱ्या संस्था यांच्यात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न सुरु केला.

• आपत्ती व्यवस्थापन कायद्याची ठळक वैशिष्ट्ये

१. आपत्ती व आपत्ती व्यवस्थापन याघटकाच्या व्याख्येत व्यापकता §

भारतातील आपत्ती व्यवस्थापनाची व्याप्ती २००५ पर्यंत फक्त तात्काळ मदत व पुनर्वसन कार्यपूर्ती मर्यादित होती. परंतु आता आपत्ती व्यवस्थापनकायद्यातील प्रकरण १. कलम २ (इ) नुसार आपत्तीपूर्व कालासंबाधी आपत्ती प्रतिबंध यंत्रणा किंवा पूर्वतयारी या बाबीसुद्धा समविष्ट करण्यात आल्या आहेत.

२. त्रिस्तरीय संस्थात्मक संरचना §

आपत्ती व्यवस्थापनासाठीशासकीय पातळीवर स्वतंत्र संस्थात्मक रचना उभा करण्यात आली आहे. यामध्ये राष्ट्रीय, राज्य व जिल्हा या तीन पातळीवर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तसेच राष्ट्रीय व राज्य स्तरावर कार्यकारी समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तुत तरतुदीमुळे आंतरविभागीय समन्वय राखला जाणार आहे.

३. आपत्ती व्यवस्थापन धोरण व कृती आराखड्यांना महत्व-

राष्ट्रीय, राज्य, जिल्हाआपत्ती व्यवस्थापन धोरण व आराखडा तयार करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. तसेच केंद्र व राज्यातील प्रत्येक मंत्रालय किंवा विभागाने विकास कार्यप्रणालीचा आणि संभाव्य धोक्याचा विचार करणे अनिवार्य आहे. असे नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक गावाचा, शहराचा, जिल्ह्याचा आणि राज्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे हे या कायद्याने अनिवार्य केले आहे.

४. राष्ट्रीयआपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण-

आपत्ती व्यवस्थापनाविषयीसंशोधन व प्रशिक्षणाची जबाबदारी पार पडण्यासाठी -राष्ट्रीयआपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण॰ या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.प्रस्तुत संस्था ही केंद्र शासनाची अधिकृत संस्था असल्याने आपत्ती व्यवस्थापनाच्या राष्ट्रीय स्तरावरील धोरणामध्ये व कारभारामध्ये या संस्थेचा मोलाचा वाटा असणार आहे. प्रस्तुत कायद्यानुसार या प्रधीकारांचे सर्वेसर्वा हे भारताचे पंतप्रधान असतील.

५. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल §

आपत्कालीन परिस्थितीत मदत, बचाव व इतर प्रतिसादात्मक कार्य सक्षमपणे हाती घेण्यासाठी -राष्ट्रीयआपत्ती प्रतिसाद दलाची॰ स्थापना करण्याची तरतूद कायद्यात आहे व हे दल राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली काम करेल.

६. आपत्ती प्रतिसाद निधी व आपत्ती निवारण निधी §

या कलमांतर्गत दिला जाणारा निधी हा आपत्तीची तीव्रता कमी व्हावा म्हणून करावयाच्या उपायांसाठी आहे तर आपत्ती प्रतिसाद निधी हा आपत्तीचा सक्षमपणे सामना करावयाच्या कार्यासाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

७. आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत गुन्हे व दंड §

प्रस्तुत कायद्यातील प्रकरण १० मधील कलम ५१ टे ५८ यामार्फतआपत्ती व्यवस्थापनशीनिगडीत विविध प्रकारचे गुन्हे व त्यावर करावयाच्या कार्यवाहीची तरतूद आहे.आपत्तीकालीन मदतीचा लाभ जाणीवपूर्वक खोटा दावा करणे, मदतीचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी करणे, आपत्ती किंवा तिच्या तीव्रतेबद्दल अवास्तव अफवा पसरवणे इत्यादी गुन्ह्याचा व त्यावरच्या दंडाच्या समावेश केला आहे.

८. आपत्ती व्यवस्थापन कायद्यातर्गत इतर तरतुदी §

आपत्ती व्यवस्थापन कायद्यात समाजीं विषमतेला प्रतिबंध घालणारे धोरण अंत्रभूत आहे. कोणत्याही व्यक्तीला संसाधन उपलब्ध करून देण्याबाबतचे अधिकार राष्ट्रीय , राज्य किंवा जिल्हा कार्यकारी समितीला प्रदान करण्यात आले आहेत. प्रसार माध्यमांना धोक्याची सूचना देण्याच्या कार्यवाहीबाबत या कायद्यात मार्गदर्शन



Scanned with OKEN Scanner

करण्यात आले आहे.

सारांश-

पृथ्वीवरील वदलत्या पर्यावरणामुळे आज आपत्ती व्यवस्थापनाची गरज निर्माण झाली आहे. मानव आणि आपत्ती यांचा संबंध अनादी काळापासून आहे त्यामुळे मानवी जीवनामध्ये प्रचंड प्रमाणात स्थित्यंतरे घडून आली आहेत आणि भविष्यातही येतील त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन ही मनुष्य जीवनाची गरज निर्माण झाली आहे. आपत्ती ही अनिश्चित असते ती केंव्हा येईल हे कोणाच माहिती नसते ते रोखण्यासाठी आपण काहीच करू शकत नाही म्हणूनच आपत्ती व्यवस्थापनाची गरज आहे. आपत्ती व्यवस्थापनाकरितासमाज जागृती, लोकसहभाग आणि शासकीय पातळीवर कार्यतत्परता हे देखील महत्वाचे आहे.

संदर्भ ग्रंथ §


१. डॉ.पवार. सी. टी(१९९८) § पर्यावरण भूगोल, सप्रेम नमस्कार, कोल्हापूर

२. डॉ. पाटील. वाय. व्ही(२००५) § पर्यावरणअभ्यास, अक्षरवेल प्रकाशन, सोलापूर

३. डॉ. खरात संभाजी(२०१२) § आपत्ती व्यवस्थापन, प्रतिमा प्रकाशन, पुणे





ISSN 2278-5914
Special Issue
March 2025

Kisan Shikshan Sanstha's

## Krantisinh Nana Patil College, Walwa

Dist. Sangli. 416313.


Re-accredited. with $B^{++}$ (CGPA 2.87) by NAAC

### One Day International Conference
on

# Recent Trends and Challenges in Social Sciences and Literature

Organized by IQAC in Collaboration with
Shivaji University, Kolhapur





Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg No.Maharashtra/13482/Satara/2010)
Email ID: sisms2010@gmail.com

# SANSHODHAN

Peer Reviewed Research Journal

Scanned with OKEN Scanner

## SATARA ITIHAS SANSHODHAN MANDAL, SATARA

(Inst. Reg No.Maharashtra/13482/Satara/2010)

Email ID: sisms2010@gmail.com

# SANSHODHAN

PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

SPECIAL ISSUE

March 2025

ISSN 2278-5914

| Editorial Board | |
|---|---|
| Prin. Dr. Vijayrao Nalawade | Prof. Dr. Urmila Kshirsagar |
| Prof. Dr. Jaypal Sawant | Prof. Dr. Ajitkumar Jadhav |
| Prof. Dr. Suresh Chavan | Prof. Dr. Sanjeev Bodkhe |
| Prof. Satish Chougule (Guest Editor) | |

**VOLUME - II**

Scanned with OKEN Scanner

SANSHODHAN Peer Reviewed Research Journal ISSN 2278-5914 Special Issue March 2025

# INDEX

## VOLUME - II


| | | |
|---|---|---|
| 47 | हैद्राबाद संस्थानातील मराठवाडयाचा स्वातंत्र्य संग्राम - डॉ. एस. एन. दाडंगे | 200 |
| 48 | भाळवणी येथील शिलालेखाचे स्थलांतर व सद्यस्थिती - प्रा. गौतम गणपती काटकर | 207 |
| 49 | वारणा सिंचन प्रकल्प: ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि विकास प्रक्रिया- प्रा.सतीश चौगुले | 211 |
| 50 | कुंडल येथील जैन तीर्थदर्शन: एक अभ्यास -प्रो. डॉ. विवेकानंद राजाराम माने | 218 |
| 51 | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास: शिरगावचाचिकित्सक अभ्यास<br>डॉ. के. आर. जाधव, डॉ. प्रवीण भाकरे , प्रा. श्रीमती स्नेहल राजहंस | 221 |
| 52 | LGBTQ : हक्क व अधिकारांचे समाजशास्त्रीय विश्लेषण - श्री. जगदीश केशवराव ससाणे | 225 |
| 53 | स्थलांतर आणि नागरीकरणाचे सामाजिक व आर्थिक परिणाम : एक समाजशास्त्रीय अभ्यास –<br>प्रा. डॉ. अनिल म्हाळाप्पा गाडेकर | 232 |
| 54 | महिलावरील वाढत्या हिंसाचाराचा अभ्यास -प्रा. डॉ. गोविंद नागनाथराव ढोबळे | 238 |
| 55 | सामाजिक न्याय आणि समानता : वर्तमानट्रेंडआणिसमस्या<br>शुभांगी प्रभाकर जावळे | 242 |
| 56 | पर्यावरण आणि माहिती तंत्रज्ञानाची भुमिका - प्रा. डॉ. रमेश काशीराम शेंडे | 247 |
| 57 | स्त्री वादाचा उदय व विकास : एक चिकीत्सक अभ्यास -<br>प्रा. प्राजक्ता शिवाजी कुंभार | 252 |
| 58 | आपत्ती व्यवस्थापन - डॉ. शितल चंद्रकांत पाटील | 256 |
| 59 | एक राष्ट्र एक निवडणूक संकल्पनेचे फायदे व तोटे -प्रा. आकाश विलास जाधव | 260 |
| 60 | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीतील शेतकरी शोषणाचे प्रतिबिंब<br>डॉ.केशव धोंडिबा टिपरसे | 264 |
| 61 | समसामयिक परिवेश का कोलाज – 'जिंदगी हैं..... हैंडल हो जाएगी'!<br>प्रोफेसर (डॉ.) विजय महादेव गाडे | 269 |
| 62 | काशीनाथ सिंह के उपन्यास में स्थानिय संस्कृति('काशी का अस्सी' के संदर्भ में )<br>भालदारे भक्ती शंकर | 274 |
| 63 | मालती जोशी के कहानियों में अविवाहित नारी - प्रा. शहिदा नजीर अत्तार | 278 |
| 64 | जय शंकरप्रसाद का काव्य - सौंदर्य और छायावादी प्रवृत्तियाँ।<br>सौ. मानसी संभाजी शिरगांवकर | 282 |


Scanned with OKEN Scanner